दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




✻ वर्ष : ०१ ले ✻ | ✻ अंक : ५५ ✻ | ✻ शुक्रवार २४ सप्टेंबर २०२६ ✻ | ✻ जालना ✻ | ✻किंमत : २ रूपये ✻ | ✻पृष्ठे : ४ ✻
◎Volume 01◎ | ◎ Issue 55 ◎ | ◎ Friday, Date : 25 September 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2◎ | ◎Pages 4 ◎

## सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे : माजी मंत्री दानवे



जालना (प्रतिनिधी): जालना : मागील दीड महिन्यापासून बदनापूर तालुक्यासह जालना जिल्ह्यात तसेच मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागात पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग यांसह विविध खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला असून जवळपास सर्व पिके वाळून गेली आहेत. त्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी बदनापूर तालुक्यातील नजीक पांगरी, केळीगव्हाण, राजेवाडी, दावलवाडी आदी गावांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष पीक परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न केले जातील. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान बदनापूर तालुक्यातील अनेक भागांत पावसाचा दीर्घ खंड पडल्यामुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. परिणामी सोयाबीन पिक पूर्णपणे वाळले आहे. कापूस, तूर आणि मूग या पिकांनाही पावसाच्या खंडाचा मोठा फटका बसला आहे. या पिकाची वाढ पूर्णपणे खुंटली आहे, कपाशीला दोन-दोन चार-चार बोंड आले आहेत, दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शेतातील पिकाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त क्षेत्राचे सर्वेक्षण करावे आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे. तसेच पीक विमा, दुष्काळी मदत आणि इतर शासकीय योजनांचा लाभ तातडीने मिळावा, अशी शेतकऱ्यांनी रावसाहेब पाटील दानवे यांच्याकडे अपेक्षा(पान ३ वर)

# शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आ.रोहित पवार; दुष्काळग्रस्त पिकांची केली पाहणी

## हेक्टरी किमान एक लाखाची मदत द्या; माजी मंत्री राजेश टोपे यांची मागणी





जालना (प्रतिनिधी) : छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीची आमदार रोहित पवार आणि माजी मंत्री राजेश टोपे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. या वेळी करपलेली पिके, कोरड्या पडलेल्या विहिरी तसेच चारा व पाणीटंचाईमुळे शेतकरी आणि पशुपालकांसमोर उभ्या राहिलेल्या संकटाचा त्यांनी आढावा घेतला. आ. रोहित पवार व माजी मंत्री राजेश टोपे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील निपाणी, राजापूर, आडगाव तसेच जालना जिल्ह्यातील डोमेगाव आणि दुनगाव येथे भेट दिली. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, मका, बाजरी, तूर आणि ऊस आदी पिकांची त्यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली. या वेळी शेतकऱ्यांनी पिकांच्या नुकसानीची माहिती देत आपली व्यथा त्यांच्यासमोर मांडली. पावसाअभावी हातातोंडाशी (पान ३ वर)

## घाणेवाडी तलाव परिसरात २०० मीटर प्रतिबंधात्मक आदेश



जालना/प्रतिनिधी : आगामी श्री गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील घाणेवाडी तलाव परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

श्री गणेश विसर्जन २५ सप्टेंबर २०२६ रोजी असल्याने काही गणेश मंडळांकडून घाणेवाडी तलावात गणेशमूर्ती विसर्जनासाठी गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच घाणेवाडी तलावातून जालना शहराला पाणीपुरवठा होत असल्याने तेथे श्री गणेशमूर्ती विसर्जन केल्यास संबंधित ग्रामस्थांकडून विरोध होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर घाणेवाडी तलावाच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. या आदेशाची अंमलबजावणी पोलीस अधीक्षक, जालना यांनी ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांना माहिती देऊन करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश २५ सप्टेंबर (पान ३ वर)

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम



जालना/प्रतिनिधी : राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहेत. पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे सोमवार, दि. २८ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता जालना येथे आगमन दुपारी १.३० वाजता बदनापूर व जालना तालुक्यात पीक परिस्थिती पाहणी करतील. दुपारी २.३० वाजता जालना येथून वाहनाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# बकऱ्या चोरी प्रकरणी दोघांना अटक



जालना (प्रतिनिधी) : परतूर परिसरातील बकऱ्या चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने दोघांना अटक केली आहे. त्यांच्या चौकशीत जालना जिल्ह्यातील बकऱ्या चोरीचे एकूण १८ गुन्हे उघडकीस आल्याची माहिती पोलिसांनी दिली. चोरीसाठी वापरलेली स्विफ्ट कार आणि चोरीसंबंधी साहित्य असा एकूण ४ लाख १ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात जनावरे चोरीच्या घटनांचा शोध घेण्याचे निर्देश पोलिस अधीक्षक तेजवीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांच्या पथकाने संशयितांची माहिती गोळा करून तपास सुरू केला. तपासादरम्यान परतूर येथील आठ बकऱ्या चोरीप्रकरणी रईस सरदार शाह (वय २०, रा. सिरसगाव मंडप, ता. भोकरदन, जि. जालना) याच्याबाबत माहिती मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. पथकाने त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीत मिळालेल्या माहितीच्या आधारे रईस शाह आणि सलीम सांदू शेख (रा. औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर) (पान ३ वर)

## आ. नारायण कुचे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर नुकसानग्रस्त पिकांची केली पाहणी



बदनापूर / प्रतिनिधी : पावसाने उघड दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वरुडी, ता. बदनापूर येथे आमदार नारायण कुचे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पाण्याअभावी पिकांची झालेली बिकट अवस्था, संभाव्य नुकसान तसेच शेतकऱ्यांसमोरील अडचणींची त्यांनी पाहणी करून कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सद्यस्थितीची माहिती घेतली. यावेळी आ. कुचे यांनी शेतकरी बांधवांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या आणि अडचणी जाणून घेतल्या. पिकांचे नुकसान, पावसाची प्रतीक्षा आणि आगामी काळातील आवश्यक उपाययोजनांबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. नैसर्गिक संकटाच्या काळात महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला असून, शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळवून (पान ३ वर)

## जिल्ह्यातील नियोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ स्थगित

जालना/प्रतिनिधी :महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यात २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ' स्थगित करण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना तसेच मॉडेल करिअर सेंटर, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने विविध ठिकाणी या रोजगार महाकुंभाचे आयोजन करण्यात येणार होते. मात्र, छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. रोजगार महाकुंभाची नवीन तारीख आणि कार्यक्रमाचे वेळापत्रक योग्य वेळी प्रसिद्धी माध्यमांद्वारे जाहीर करण्यात येईल, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी दिली. दरम्यान, रोजगाराच्या शोधात असलेले युवक-युवती, नोकरी इच्छुक उमेदवार, नियोक्ते, औद्योगिक आस्थापना तसेच संबंधित घटकांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## गणरायाच्या साक्षीने डॉ. उमेश जाधव यांचा जनसंवाद; शेतकऱ्यांसाठी दिलासा मिळावा अशी प्रार्थना

### मच्छिंद्रनाथ चिंचोलीत गणेश आरती कार्यक्रम उत्साहात; स्वरा फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक



**किशोर मोरे /घनसावंगी,** प्रतिनिधी : तालुक्यातील मच्छिंद्रनाथ चिंचोली येथे गणेश मंडळाच्या आरतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ व जनसेवक डॉ. उमेश बळीराम जाधव यांनी गावकरी, युवक आणि गणेशभक्तांशी संवाद साधत सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. कार्यक्रमात भक्तिमय वातावरणासह समाजोपयोगी विषयांवर चर्चा रंगली.

डॉ. जाधव यांनी स्वरा फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू, अनाथ आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या (पान ३ वर)

**गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजाला एकत्र आणणारा आणि सकारात्मक ऊर्जा देणारा सोहळा आहे. मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील ग्रामस्थांनी दिलेले प्रेम व सन्मान माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. समाजातील गरजू, अनाथ आणि वंचित घटकांसाठी सेवा कार्य सातत्याने सुरू राहील. तसेच सध्या संकटांचा सामना करणाऱ्या शेतकरी बांधवांना बळ मिळावे, त्यांच्या जीवनात सुख-समृद्धी यावी, हीच गणरायाच्या चरणी प्रार्थना आहे.**



**डॉ. उमेश बळीराम जाधव**
**(अध्यक्ष स्वरा फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य )**




# गणेश विसर्जनासाठी जालन्यात वाहतूक मार्गात बदल ; २५ सप्टेंबर रोजी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे पोलिस अधीक्षकांचे आदेश



जालना/प्रतिनिधी : गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात दि. २५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन मिरवणूक पारंपरिक मार्गाने काढण्यात येणार आहे. या काळात मिरवणुकीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये, रस्ता मोकळा राहावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी शहरातील वाहतुकीत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. याबाबत पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ अन्वये आदेश जारी केला आहे.

आदेशानुसार, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा-टांगा स्टँड-सराफा बाजार-पाणीवेस-सुभाष चौक या मार्गावरून जुन्या जालन्याकडे जाणारी वाहतूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, ओम हॉस्पिटल, मंगल बाजार, चमन बाजार, राजमहल टॉकीजजवळील पुलावरून ग्लोबल गुरुकुल शाळेजवळून बायपास रोडने अंबड चौफुली, नूतन वसाहत मार्गे वळविण्यात येणार आहे.

तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा-बडीसडक-सराफा बाजार-जवाहर बाग चौकी-रहेमान गंज मार्गे जुना मोंढा या मार्गावरील वाहतूक शिवाजी महाराज पुतळा, जिजामाता प्रवेशद्वार, जेईएस कॉलेज, बाबुराव काळे चौक, रहेमान गंज मार्गे वळविण्यात येणार आहे.

नवीन जालना-सदर बाजार परिसर-रहेमान गंज-मुर्गी तलाव परिसर-जवाहर बाग चौकी परिसरातील वाहतूक मामा चौक व सुभाष चौक मार्गे जुन्या जालन्याकडे जाण्यासाठी जुना मोंढा कमान, दीपक वाईन शॉप, बसस्थानक, लक्कड कोट, शिशटेकडी मार्गे वळविण्यात येणार आहे.

बसस्थानकाकडून येणारी वाहतूक सुभाष चौक, पाणीवेस मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याकडे जाताना बसस्थानक, दीपक वाईन शॉप, जुना मोंढा कमान, मुरगी तलाव, बाबुराव काळे चौक, जेईएस कॉलेज, जिजामाता प्रवेशद्वार मार्गे वळविण्यात येणार आहे.

रेल्वे स्टेशनकडून मंमादेवी मार्गे गांधी चमन व मंमादेवी मार्गे नवीन जालन्यात जाणारी (पान ३ वर)



मुकबधिर मित्र गणेश मंडल परतुर

# संपादकीय

## लाडक्या गणरायला निरोप

दहा दिवसांचा भक्तीमय उत्सव, ढोल-ताशांचा निनाद, आरतीचा मंगल स्वर, सजविलेले मंडप, आकर्षक देखावे, गणरायाच्या जयघोषाने दुमदुमलेले रस्ते आणि बाप्पाच्या दर्शनासाठी लोटलेला जनसागर... हे सारे क्षण आता आठवणींचा भाग होणार आहेत. आज लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप देताना प्रत्येकाच्या मनात एकच भावना आहे- गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही. तो महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक एकजुटीचे स्वरूप दिले. त्यामुळे गणरायाच्या उत्सवात भक्तीबरोबरच समाजप्रबोधन, बंधुभाव, सामाजिक ऐक्य आणि सार्वजनिक सहभागाची परंपरा निर्माण झाली. आजही ही परंपरा जपण्याची जबाबदारी प्रत्येक गणेशभक्ताची आहे.

दहा दिवसांच्या काळात गावागावांत आणि शहराशहरांत गणरायाच्या स्वागतासाठी मोठी तयारी करण्यात आली. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला. कुठे पारंपरिक आरती, कुठे भजन-कीर्तन, कुठे सांस्कृतिक कार्यक्रम, तर कुठे सामाजिक संदेश देणारे देखावे सादर करण्यात आले. अनेक मंडळांनी रक्तदान, आरोग्य तपासणी, स्वच्छता अभियान, गरजू विद्यार्थ्यांना मदत अशा उपक्रमांतून उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. अशा उपक्रमांमुळे गणेशोत्सवाचे खरे सामाजिक महत्त्व अधोरेखित होते.

मात्र उत्सवाच्या या आनंदाबरोबरच निरोपाच्या दिवशी आत्मपरीक्षणाची वेळही आली आहे. गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत आपण मोठ्या श्रद्धेने त्याची पूजा केली. पण गणरायाने दिलेला संदेश आपण आपल्या जीवनात किती उतरवला, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

गणपती म्हणजे बुद्धी, विवेक आणि सद्बुद्धीचे प्रतीक. त्यामुळे बाप्पाची पूजा करताना आपल्या समाजातील अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, भेदभाव, अस्वच्छता, पर्यावरणाचा ऱ्हास आणि सामाजिक विषमता यांच्याविरोधात उभे राहण्याची प्रेरणा घेणे आवश्यक आहे. फक्त दहा दिवस गणरायाचा जयजयकार करून वर्षभर त्याच्या शिकवणीपासून दूर राहण्यात उत्सवाचे सार्थकत्व नाही.

विशेषतः पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही आजची मोठी गरज आहे. विसर्जनाच्या वेळी नदी, तलाव आणि जलस्रोतांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माल्य, प्लास्टिक आणि इतर कचरा जाणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंग, कृत्रिम तलाव आणि निर्माल्य संकलन यांसारख्या पर्यावरणपूरक उपायांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. बाप्पाला निरोप देताना आपल्या जलस्रोतांचे रक्षण करण्याचा संकल्प केला, तर तोच गणरायाला दिलेला खरा मान ठरेल.
उत्सवातील ध्वनिप्रदूषणाचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे. आनंद साजरा करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र त्याचवेळी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, विद्यार्थी आणि प्राणी यांचाही विचार करणे गरजेचे आहे. उत्सवाचा आनंद दुसऱ्याच्या त्रासाचे कारण बनू नये. भक्तीला शिस्तीची जोड मिळाली, तरच सार्वजनिक उत्सव अधिक सुंदर होईल.
गणेशोत्सवाने समाजाला एकत्र आणण्याचे काम केले पाहिजे. मंडपात जात, धर्म, पंथ, श्रीमंत-गरीब असे भेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येणे हीच महाराष्ट्राच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची खरी ताकद आहे. गणरायाच्या चरणी सर्व समान आहेत. त्यामुळे उत्सव संपल्यानंतरही हा बंधुभाव कायम राहिला पाहिजे.

आज विसर्जनाच्या मिरवणुकीत हजारो हात बाप्पाला निरोप देतील. ढोल-ताशांचा गजर होईल, गुलाल उधळला जाईल, गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष होईल. काहींच्या डोळ्यांत आनंदाश्रू असतील, तर काहींच्या मनात पुढील वर्षीच्या आगमनाची आतुरता असेल. पण या भावनिक क्षणाला एक नवा अर्थ देण्याची गरज आहे.

बाप्पाला निरोप देताना केवळ मूर्तीचे विसर्जन करू नये; आपल्या मनातील अहंकार, द्वेष, मत्सर, व्यसन आणि वाईट प्रवृत्तींचेही विसर्जन केले पाहिजे. गणरायाच्या आगमनाने घरात आणि समाजात निर्माण झालेली सकारात्मक ऊर्जा वर्षभर टिकवून ठेवण्याचा संकल्प केला पाहिजे.

गणरायाकडे आपण सुख, समृद्धी, आरोग्य आणि यशाची प्रार्थना करतो. परंतु समाजातील प्रत्येक घटक सुखी आणि सुरक्षित असेल, तरच त्या प्रार्थनेला अर्थ आहे. शेतकरी संकटात असेल, तर त्याच्या पाठीशी उभे राहणे; विद्यार्थी शिक्षणापासून वंचित असेल, तर त्याला मदत करणे; गरीब कुटुंबाला आधाराची गरज असेल, तर मदतीचा हात देणे; गावात अस्वच्छता असेल, तर स्वच्छतेसाठी पुढाकार घेणे- हीच गणरायाची खरी सेवा आहे.

गणेशोत्सव संपतो आहे, पण गणरायाचा संदेश संपत नाही. मंडपातील रोषणाई उतरवली जाईल, ढोल-ताशे थांबतील, सजावट काढली जाईल आणि रस्ते पुन्हा नेहमीसारखे होतील. मात्र आपल्या मनात निर्माण झालेली भक्ती, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक विचार कायम राहिले पाहिजेत.

आज लाडक्या गणरायाला निरोप देताना प्रत्येकाच्या ओठांवर एकच जयघोष असू दे-गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! पण पुढच्या वर्षी बाप्पा येईपर्यंत आपणही काहीतरी चांगले करून दाखवू, असा संकल्प असू दे.
गणराय पुन्हा येईल. पुन्हा ढोल वाजतील, पुन्हा आरत्या होतील, पुन्हा सजावट होईल. पण पुढच्या आगमनापूर्वी आपल्या गावात, आपल्या शहरात आणि आपल्या समाजात काहीतरी सकारात्मक बदल घडला पाहिजे.
बाप्पाला निरोप देताना हीच खरी प्रार्थना-
हे गणराया, तुझी मूर्ती आज विसर्जित होत आहे; पण तुझी शिकवण आमच्या मनात सदैव जिवंत राहू दे. आमच्या हातून समाजाची सेवा घडू दे, पर्यावरणाचे रक्षण होऊ दे, माणसामाणसांत प्रेम आणि बंधुभाव वाढू दे. आणि पुढच्या वर्षी जेव्हा तू पुन्हा येशील, तेव्हा तुझ्या स्वागतासाठी अधिक सुंदर, स्वच्छ, संवेदनशील आणि एकजुटीचा समाज उभा असू दे.

गणपती बाप्पा मोरया!
मंगलमूर्ती मोरया!
पुढच्या वर्षी लवकर या!

# गणेश विसर्जन करतांना सावधगिरी बाळगा; प्रशासनाच्या नियमांचे पालन करा

गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे.त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.कारण गणपती विसर्जन करतांना नदी,तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत आपल्या चुकांनमुळे दुर्घटना होऊ शकते याला नाकारता येत नाही आणि अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. मागील वर्षी राज्यभरात वेगवेगळ्या जिल्ह्यात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे गणेश विसर्जन करतांना सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन (नदी,तलाव,विहीर, समुद्र किनारा) यापासून दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक संपूर्ण परिवारावर मोठा आघात करू शकते. कारण खेड्यापाड्यात,शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात.अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढावून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच.परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण(स्थळ)दिले आहे किंवा प्रशासनाने बनवीलेल्या कृत्रिम तलाव यामध्ये विसर्जन करायला हवे. यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सर्वांनी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी.कारण आपण अनेकदा पाहिले व ऐकले सुध्दा आहे की मुर्ति विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत.या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.ज्या-ज्या ठीकाणी कृत्रीम तलाव (आर्टीफीशीयल टँक) ची व्यवस्था केलेली आहे, त्या-त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे.परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी,विहीर, समुद्र किनारा,किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन



करतात त्या-त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे. मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात.अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे.कारण छोटीशी चुक मोठा आघात पोहचवु शकते याला नाकारता येत नाही आणि याचे दु:ख संपूर्ण परिवाराला व मंडळाला भोगावे लागते.गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे निर्माल्य तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या-ज्या ठिकाणी केली आहे त्या-त्या ठिकाणीच टाकावे.यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल. अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे.गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार व विराजमान होणारच.कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या!असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो. परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा. अशा पध्दतीने गणपती बाप्पाच्या नावाने राज्यात दरवर्षी हजारो झाडांची लागवड अवश्य होईल यामुळे गुरांना चारा,सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.कारण गणपती बाप्पासह संपूर्ण देवीदेवतांचे वास्तव्य निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे त्यामुळे बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव लक्षात घेता वृक्षलागवड मानव कल्याणासाठी व पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना आणि निसर्ग प्रफुल्लित करण्यासाठी प्रत्येक सणांना वृक्ष लागवड व्हायलाच हवी.बाप्पाला निरोप देतांना आपण सर्व भक्तगण साकडे घालूया येणाऱ्या दुष्काळापासुन बळीराजाला वाचवा. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या जय श्री गणेशाय नमः!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर.**

# अनंत चतुर्दशीनिमित्त मुंबईमध्ये वाहतुकीत बदल

नवी मुंबई : गणेशोत्सवाच्या अखेरच्या टप्प्यात म्हणजेच अनंत चतुर्दशीनिमित्त बाप्पाला साश्रू नयनांनी निरोप देण्यासाठी सर्वत्र तयारी सुरू आहे. यादरम्यान, गणेश मूर्ती विसर्जन मिरवणुका सुरळीत पार पाडाव्यात आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागू नये, यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी कंबर कसली आहे. सुरक्षेची काळजी घेत पोलिसांनी शहरातील अनेक महत्त्वाचे रस्ते आणि मार्ग वाहतुकीसाठी बंद केले असून, खारघर व कळंबोली परिसरात विशेष वळणमार्ग (पर्यायी मार्गांची) घोषणा करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे वाहतूक निर्बंध २५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून लागू होणार असून, विसर्जन मिरवणुका पूर्ण होईपर्यंत अंमलात राहतील. हे निर्बंध निर्धारित मार्गांवरील गणेश विसर्जन वाहने, पोलीस वाहने, शासकीय वाहने आणि अत्यावश्यक सेवा पुरवणारी वाहने वगळता इतर सर्वसामान्य नागरिकांच्या वाहनांना लागू असणार आहेत. अनंत चतुर्दशीच्या दिवशी वाहनांची मोठी वर्दळ अपेक्षित असल्याने रहिवाशांनी प्रतिबंधित मार्ग टाळावेत आणि प्रशासनाने



निश्चित केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन नवी मुंबईचे पोलीस उपआयुक्त (वाहतूक) डॉ. राहुल खाडे यांनी केले आहे. खारघरमधील बंद रस्ते आणि वळणमार्ग
खारघर परिसरात, डी-मार्ट सिग्नल आणि डीएव्ही इंटरनॅशनल स्कूलच्या कोपऱ्यादरम्यान दोन्ही दिशांची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच खारघर गाव मेट्रो स्टेशन आणि दिवंगत सुदाम भिकाजी पाटील कमानीसमोरील कामधेनू कॉम्प्लेक्समागील रस्ताही बंद राहील. पर्यायी मार्ग: डी-मार्ट सिग्नलकडून डीएव्ही स्कूलकडे जाणारे नागरिक सेक्टर १८ आणि १९ मार्गे जाऊ शकतात. तर विरुद्ध दिशेने जाणारे वाहनचालक वास्तुविहार चौकात उजवीकडे वळून बालाजी स्वीट्स, शिल्प चौक आणि डी-मार्ट मार्गे पुढे प्रवास करू शकतात.
कळंबोली विसर्जन मिरवणूक मार्ग कळंबोलीमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक कळंबोली-रोडपाली, सेक्टर १२ मधील म्हासर (म्हासोबा) तलावाकडे ठरलेल्या मार्गांनी मार्गस्थ होईल. यामध्ये करावली चौक, केएल-२ नाका, एसबीआय चौक, सनशाईन सोसायटी आणि बाल सोसायटीमार्गे जाणारा मुख्य मार्ग असणार आहे. तसेच सेक्टर २० मधील केतली चौक, पोलीस मुख्यालय चौक आणि हंसध्वनी गृहसंकुल मार्गे जाणारा दुसरा मार्ग असेल. अत्यावश्यक सेवा वगळता विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील काही पट्ट्यांवर वाहनांना प्रवेश बंदी असेल. त्यामुळे वाहनचालकांनी आणि स्थानिकांनी आपल्या प्रवासाचे आगाऊ नियोजन करून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे

# अनंत चतुर्दशीसाठी मुंबई महापालिकेची जय्यत तयारी

मुंबई : अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने व्यापक तयारी केली आहे. विसर्जन सोहळा सुरक्षित आणि सुरळीत पार पडावा यासाठी २५ हजारांहून अधिक अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यात आले असून, नैसर्गिक आणि कृत्रिम विसर्जन स्थळांवर मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
६७ नैसर्गिक, २७८ ठिकाणी कृत्रिम तलाव
मुंबईत ६७ नैसर्गिक विसर्जन स्थळे आणि २७८ ठिकाणी ३८३ हून अधिक कृत्रिम तलाव उपलब्ध करण्यात आले आहेत. ६ फूट उंचीपर्यंतच्या गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
सुरक्षेसाठी १,१३२ जीवरक्षक, ८५ रुग्णवाहिका, ३४ क्रेन, २३ जर्मन तराफे आणि १० मोटरबोट सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.



तसेच ६,०५२ फ्लडलाईट आणि सर्चलाईटची व्यवस्था करण्यात आली आहे. (ऋपशीर्हीरीं २०२६)
गिरगाव चौपाटीवर विशेष बंदोबस्त
स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) येथे १२ कृत्रिम तलाव, २० निरीक्षण मनोरे, २२ तराफे, ९० प्रसाधनगृहे आणि २,००० मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ रुग्णवाहिका, ५४८ फ्लडलाईट आणि ११ सर्चलाईटसह समन्वय कक्ष व पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. 'एक गणपती, एक झाड' उपक्रम महापौर रितू तावडे यांच्या संकल्पनेतून 'एक गणपती, एक झाड' उपक्रम राबवण्यात येत आहे. विसर्जित होणाऱ्या गणेशमूर्तींच्या संख्येइतकी झाडे लावण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. पर्यावरणपूरक विसर्जनाला प्रोत्साहन देण्यासाठी आतापर्यंत ९४० मेट्रिक टनांहून अधिक शाडू माती मोफत वितरित करण्यात आली असून, यंदा २५,४०० लिटर पर्यावरणपूरक रंगही विनामूल्य देण्यात आले आहेत. विसर्जन मार्गांचीही दुरुस्ती आगमन आणि विसर्जन मार्गांवरील ५०६ रस्त्यांवरील ४,२७९ खड्डे तसेच १७१ ड्रेनेज कव्हर्स दुरुस्त करण्यात आले आहेत. २८१ ठिकाणच्या अडथळा ठरणाऱ्या केबल्स हटवण्यात आल्या असून ५१५ ठिकाणी वृक्षछाटणी करण्यात आली आहे. आतापर्यंत १.६३ लाखांहून अधिक मूर्तींचे विसर्जन
यंदाच्या गणेशोत्सवात आतापर्यंत १ लाख ६३ हजार ३८६ गणेशमूर्तींचे विसर्जन झाले आहे. यात दीड दिवसांच्या उत्सवातील ६३,३१२, पाच दिवसांच्या उत्सवातील ३६,९९२, सहा दिवसांच्या उत्सवातील ४४,२६१ आणि सात दिवसांच्या उत्सवातील १८,८२१ मूर्तींचा समावेश आहे. समुद्रकिनारी 'ब्ल्यू बटन जेलीफिश' आणि 'स्टिंग रे'चा वावर लक्षात घेता नागरिकांनी समुद्रात उतरताना खबरदारी घ्यावी आणि महापालिका व पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, गिरगाव चौपाटीवर आपत्कालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात येणार असून, महापालिका, पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, एनडीआरएफ, बेस्ट आणि आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित यंत्रणांमध्ये तातडीने समन्वय साधला जाणार आहे.

### निरोप ..

सक्तीची नाही वर्गणी
गोळा ना केला चंदा
वर्गणीचे नावा खाली
थांबवला गोरखधंदा

रस्ते नाही उखडलेले
मंडप ना मोठाले यंदा
उत्सवाच्या उत्साहात
ना शहर झाले गंधा

डी जे गोंगाट संपला
शांती मिळे भक्तवृंदा
छेडछाड न महिलांची
सुख समाधाने नांदा

स्वरुप बदले सणाचे
माणूस योध्दा खंदा
रूपपालटे निमीत्ताने
बदलला नवा सांधा

भक्ती ओसंडून वाही
उत्सव जरीही साधा
लांब भलेही शरीराने
उत्साहा कुठली बाधा

उत्सव उत्सहवर्धनार्थ
विचार करावा दहादा
मूलत्वजाणू उत्सवाचे
मनाने मनाला साधा

गणराज सु संतुष्ट हो
पळवून लावे आपदा
एकोप्यात साजरे करे
सण रे आपलीसंपदा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

### गणपती ..

उत्साहात महोत्सव
फळास आली भक्ती
निर्बंध मुक्त सोहळा
सरारे आगळी शक्ती

उत्सव सफळ संपन्न
पाठी असे अधिपति
गहिवरून आले मन
गावा जाता गणपती

अस्वच्छ झाले गावं
झाडू धरलायं हाती
चकाचक करू सारे
गावावर माझी प्रिती

निघालो जरी एकला
सारी जमले भोवती
मागेआला काफिला
फळास आली युक्ती

मनी सदा गणपती
आतां गावाची भक्ती
लख्ख जिथे घर दार
लक्ष्मीचीअसे वसती

बोलण्या पेक्षा कृती
आपली ही संस्कृती
गणराजा तव कृपेने
मिळे अद् भूत शक्ती

विसर्जन जडचित्ताने
पुनरागमनाय् विनंती
गणराया वाटोयावेचं
लावे स्वच्छतापणती

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

### धतड धतड ..

ढोल ताशे वाजती
यंदा धतड धतड
निर्बंध मुक्त उत्सव
धुडूम धाड धडड

खुले अर्थव्यवस्था
बाजार होई उघड
आडकाठी मुळी न
उत्साह आहे रगड

उर्जा अंगात एवढी
नाचू लागेलं दगड
जोशात साजे सण
यंदा भरपूर सवड

उत्सवप्रेमी माणूस
जपेआपलीआवड
आजाराची आता
कमी झालीआकड

काळजी घेण्याची
तरीही असे निकड
आपले हवे बंधन
होऊ नका माकड

उत्सवामागचाभाव
प्रत्यक्ष हवी सांगड
जमवा सुंदर नाती
उत्साहा नकोधांगड

जराजपावे स्वताला
उत्साहा घाला मुरड
विघ्नहर्ताप्रसन्नचित्त
नको संकटाचीदरड

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

### मिरवणूक सैराट

मिरवणूक जल्लोष
अ वर्णनीय तो थाट
गुलालात रंगे सगळे
उसळे उत्साही लाट

अडतेऋग्णवाहिका
कशीबशी काढेवाट
ऋग्ण ते अत्यावस्थ
यम राज पाही वाट

खिसेकापू चोर जोर
गुन्ह्यांचा सुळसुळाट
कमाई क्षणार्धे साफ
लावतात पुरती लाट

जोडेतुटे कपडे फाटे
धुसमुसळी बसे चाट
अश्लील चाळे चाले
घुमे वासनांध पिसाट

जादुची हातचलाखी
पराक्रम दावे अचाट
संधी शोधे संधीसाधू
ते दंगलखोर मोकाट

छेड छाड धुडूम् धाड
मातलेउलथले सैराट
कसेकरायचे नियंत्रण
गडबड गोंधळ विराट

पळवूनेती लहानग्या
शक्कल काढे भन्नाट
पवित्र या सोहळ्यास
लागले गालबोट नाट

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

पान ४ वरून... पान ४ वरून... पान ४ वरून... पान ४ वरून...

## योगीराज कैलासनाथ महाराजांच्या

सांगितले. ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीबरोबरच नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणारे उद्योग उभारणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख पाहुणे नंदकुमार देशमुख यांनी घोगरे पाटील परिवाराचे अभिनंदन करत ग्रामीण भागात आधुनिक सुविधा उपलब्ध होत असल्याने स्थानिक विकासाला चालना मिळते, असे सांगितले. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन अशा सेवा-सुविधांचा विस्तार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.उद्घाटन सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ, वाहनधारक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

## विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या

योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, प्रधानमंत्री आवास योजना आणि प्रधानमंत्री किसान सन्मान निधी यासह विविध शासकीय योजनांचा पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांची यंत्रणा शिबिरांमध्ये उपस्थित राहणार आहे. शिबिरापूर्वी वस्तीस्तरावर पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात येणार आहे. अभियानादरम्यान पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे तात्काळ वाटप करण्यावर भर देण्यात येणार आहे. संबंधित उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच जिल्हा व तालुकास्तरावरील विविध विभागांचे सक्षम अधिकारी शिबिरांना उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या पात्र नागरिकांनी संबंधित शिबिरांच्या ठिकाणी उपस्थित राहून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी आणि उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अनंत कदम यांनी केले आहे.

## तालुकानिहाय शिबिरांचे

शाहपूर येथे शिबिर होणार आहे.

**घनसावंगी तालुका** : २७ सप्टेंबर रोजी भिल्लवस्ती, पारधी वस्ती, - घनसावंगी शहर, कैकाडी वस्ती मांदळा रोड, घनसावंगी, कैकाडी वस्ती भावनगर, घनसावंगी शहर या परिसरातील संबंधित भटके-विमुक्त वस्त्यांमध्ये, २८ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, पारडगांव येथे, तर २९ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, रांजणी तसेच धनगर वस्ती, रांजणी येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. **मंठा तालुका** : २७ सप्टेंबर रोजी कैकाडी वस्ती, मंठा येथे, २८ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, मंठा येथे, तर २९ सप्टेंबर रोजी धनगर वस्ती, तळणी येथे शिबिर होणार आहे. **परतूर तालुका** : २७ सप्टेंबर रोजी वडार वस्ती येथे, २८ सप्टेंबर रोजी शिकलकरी वस्ती, परतूर येथे, तर २९ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, आष्टी येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. **भोकरदन तालुका** : २७ सप्टेंबर रोजी नाथगोसावी वस्ती, भोकरदन, गोसावी समाज वस्ती फत्तेपूर (शिबीर नाथगोसावी येथे) भोकरदन परिसरात, २८ सप्टेंबर रोजी पारधी वस्ती व लबानवस्ती-राजुर, परिसरात तर २९ सप्टेंबर रोजी तसेच बंजारा/ वस्ती, तपोवन, गोसावी वस्ती - मोतीनगर तपोवन परिसर येथे शिबिर होणार आहे. **जाफ्राबाद तालुका** : २७ सप्टेंबर रोजी वडार वस्ती, गोंधळी वस्ती व धनगर वस्ती, खासगांव येथे, २८ सप्टेंबर रोजी गोसावी वस्ती, माहोरा येथे, तर २९ सप्टेंबर रोजी वडार वस्ती, जाफ्राबाद तसेच भोई वस्ती, जाफ्राबाद येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## मराठवाडा संघटन आढावा

थेट संवाद, सातत्यपूर्ण आढावा आणि प्रभावी नियोजन हाच शिवसेना संघटनबांधणीचा मुख्य संकल्प आहे, असे प्रतिपादन या वेळी नेत्यांनी केले. प्रमुख नेत्यांची व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती या बैठकीस शिवसेना उपनेते तथा माजी मंत्री आमदार अर्जुनराव खोतकर, संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, जिल्हासंघटक ड. भास्कर मगरे, शिवसेना शहर प्रमुख विष्णु पाचफुले महिला जिल्हासंघटक कालिंदाताई ढगे आणि युवती सेना जिल्हासंघटक रोहिणी पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच उपजिल्हाप्रमुख भूषण शर्मा, प्रवीण फुके पाटील, संतोष मोहिते, रावसाहेब पवार; युवा जिल्हा समन्वयक संतोष जेधे पाटील; युवासेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम; युवासेना लोकसभा प्रमुख गणेश मोहिते; तालुकाप्रमुख कल्याणराव अवघड, भगवान अंभोरे, नानासाहेब वानखेडे, दत्तात्रय बंगाळे, उदयकुमार बोराडे, अमोल सुरुंग, बापूसाहेब आर्दड, शिवाजी जऱ्हाड, विशाल गाडे; महिला तालुका संघटक छायाताई जऱ्हाड, शोभाताई वाघराळ; महिला शहरप्रमुख उज्ज्वलाताई पोखरिया; जि. प. सदस्य कैलास चव्हाण, सुधाकर वाढेकर, बबनराव खरात; युवासेना तालुकाप्रमुख नागेश डवले, ईश्वर जुंबड, बालाजी पवार, गणेश पुंगळे; मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे; गटनेते दीपक राठोड; नगरसेवक दुर्गेश कठोटीवाले, अश्विन अंबेकर, किशोर पांगारकर, डुकरे पाटील; शहर संघटक योगेश रत्नपारखे, घनश्याम खाकीवाले, जफरखान पठाण, शेख नजीर; माजी शहरप्रमुख बाला परदेशी; उपतालुकाप्रमुख महादू गीते, रतनकुमार नाईक, सागर पाटील, अंबादास कोळसकर, सखाराम लेके, कडूबा इंदलकर, रामकिसन कायंदे, अमोल दाभाडे, देवा ढाकणे, राहुल निगवेकर, सर्जेराव वाघ, बाळू पाचरणे आणि प्रकाशराव खरात यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, दलित आघाडी, कामगार सेना, किसान सेना, अल्पसंख्याक सेना व शिवउद्योग सहकार सेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेश विसर्जन मिरवणुकीत

ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांच्या पत्रकात नमूद आहे. मनाई हुकूम लागू झालेल्या व्यक्तींना संबंधित गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होता येणार नाही. जिल्ह्यातील गणेशोत्सव आणि विसर्जन कार्यक्रम शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांचा हा भाग आहे. हे प्रतिबंधात्मक आदेश असून, संबंधित ४३५ जणांविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याचा त्यातून अर्थ होत नाही.


# बाप्पा माझा मूर्तीदान पर्यावरणपूरक उत्सव

**बाप्पाचा आशीर्वाद... निसर्गाचा सहवास!** ₹: यावर्षी बाप्पाला निरोप देताना एक सुंदर आणि पर्यावरणपूरक सुरुवात करूया! जोडून घ्या निसर्गाची साथ आणि मिळवा बाप्पाचा अखंड आशीर्वाद! पहिल्या १०० भाविकांना (जे मूर्ती दान करतील), त्यांना एक 'जास्वंदाचे रोप' भेट म्हणून दिले जाईल.** (हे केवळ एक रोप नाही, तर बाप्पाचा तुमच्यासाठी प्रसाद आहे: **वास्तूला सौंदर्य:** हे रोप तुमच्या घराभोवती किंवा कुंडीत लावल्यास परिसर प्रसन्न आणि सुंदर दिसेल.




**पुढील वर्षी बाप्पालाच अर्पण:** या रोपाला आलेली सुंदर, लाल जास्वंदाची फुले तुम्ही पुढच्या वर्षी स्वतःच्या हाताने बाप्पाला वाहू शकाल! कायमस्वरूपी आशीर्वादहे रोप तुमच्या अंगणात सतत बहरेल पर्यावरणपूरक मूर्ती दान करा आणि बाप्पाचा हा अनोखा आशीर्वाद तुमच्या घरी घेऊन जा! व टीप: ही योजना फक्त पहिल्या १०० मूर्ती दान करणाऱ्या भाविकांसाठीच उपलब्ध आहे.*


### रस्ते ..

रस्त्यावरती घालावे
चला मांडव प्रशस्त
नगर सेवक आपले
सगळे होई आश्वस्त

नको हॉल भाड्याने
रस्ता फुकटा स्वस्त
विश्वची आमचे घर
वापरा खुशाल मस्त

कुणास नसे फिकीर
आत्ता केला दुरूस्त
मांडव तांडव करती
करी चांगले उध्वस्त

तक्रार कुणा करावी
लाचखोर रे मदमस्त
पक्ष असोत कोणता
एकसारखेचं समस्त

अतिक्रमण राजरोस
हरवून गेलेली गस्त
पादचारी गरीब सारे
काटेकोरपणे शिस्त

काय करायचे रे मला
स्वभाव बुवा भिडस्त
तोंडा मोठाली कूलूपे
भाबडेपणात नेमस्त

- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996

### शेत ..

स्पष्ट दिसते सगळे
कुंपण खातेयं शेत
अंगतपंगत बसली
झकास ठरला बेत

दुर्लक्ष करी साहेब
असूनसरळ संकेत
सुवर्णसंधी भोवती
रावण शोभे लंकेत

डंख मारो कधीही
साप पाळी खाकेत
काळारंग लागणारं
हात घालता राखेत

आशिर्वाद अदृश्यते
आहोतुझ्या समवेत
मिंधी प्रत्येक पायरी
गुन्ह्यासारे सामावेत

पोलीस सुध्दाकाही
सुटकाकराया हवेत
पळून जाई गुन्हेगार
गोळीबार करे हवेत

लोहचुंबकाची आस
खेचलेजाईलं अचेत
अग्नीजवळचेलोणी
अन्य काय अभिप्रेत

- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996

### एक्सपायरी ..

काही गोष्टी पर्मनंट
काही असे टेंम्पररी
प्रश्न असे विवादाचा
सर्वांना एक्सपायरी

सुरवांत तिथे शेवट
गोष्ट असते ही खरी
इच्छा दीर्घ काळांची
माहिती असूद्या तरी

सुटता सुटेना मोह रे
कमकुवत भले दोरी
भूक वाढो अव्याहत
संपूनजाईलं शिदोरी

रांग असे इच्छुकांची
गर्दी केवढी घरीदारी
नाचू आम्ही हवे तसे
शोधत राहती मदारी

वारसदार शोधायला
रत्ने नेमलीतदरबारी
बसवायची खुर्चीवरी
परिवार जन हरबारी

हिशोब ठेवी बरोबरी
सर्व आहेत व्यवहारी
कुणा जवळ करायचे
पाहूनठरे एक्सपायरी

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

### फोन एक ..

फोनकरता कुणांला
बोलायचे जराजपून
फोन येताचंकुणांचा
बोलावेमोजूनमापून

माहितीचेअधिकारां
टाके सर्वांस व्यापून
सी डी आरचे रेकॉर्ड
सविस्तर येते छापून

कोण कुठे गुंतला ते
राहत नसते रे लपून
लागेबांधेबाबांसोबत
करियर क्षणार्धेसंपून

सगळे पाही संशयाने
नाती टाकतातगुंफून
मोकळेहोतात सगळे
गुन्ह्यांत उगाचं जुंपून

मिडियावाले सतर्कते
बसे न्यूज साठी टपून
बदलू टाकेपरिस्थिती
का ऐनवेळेस टपकून

एक साधा फोन कॉल
सिस्टीमकाढे झोडपून
रे काही विशिष्टकेसेस
हळूचंटाकल्या दडपून

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

पान १ वरून... पान १ वरून... पान १ वरून... पान १ वरून...

## सरकार शेतकऱ्यांच्या

व्यक्त केली. पावसाने ओढ दिल्याने यंदा खरीप पिकांची स्थिती नाजूक असून जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात मोठा पाऊस न झाल्याने शंभर टक्के पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे सरकार लवकरच शेतकऱ्यांना मदत देऊन दुष्काळात करण्यात येणाऱ्या उपाययोजना तात्काळ राबवेल असा विश्वास माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला. शासन काय उपाय योजना करणार याची माहिती दिली. यावेळी काही शेतकऱ्यांना आश्रू अनावर झाल्याचे दिसून आले. पिण्याचे पाणी, हाताला रोजगार,जनावरांना चारा व शेतकऱ्यांना आर्थिक मदत या गोष्टींना प्राधान्य असून त्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. आता मोठा पाऊस पडला तरी खरिपाच्या पिकांना लाभ होणार नाही. मात्र पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी होऊ शकते. यावेळी खासदार कल्याण काळे यांनी बदनापूर येथे केलेल्या वक्तव्याचा संदर्भ देत दानवे यांनी प्रत्युत्तर दिले. आमचे सरकार शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसणार नाही, तर शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत करण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी आमच्या सरकारने काय करावे हे सांगू नये त्यांनी काय केले हे प्रथम सांगावे त्यांच्या सरकारच्या काळात फक्त एक हेक्टरक्षेत्राला मदत मिळत. आमच्या सरकारने दोन हेक्टर क्षेत्राला मदत जाहीर केली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दोन वर्षे मुख्यमंत्री होते. एक अथवा दोन वेळेस ते मंत्रालयात गेले. त्यांनी निवडणूक आयोगाविरूद्ध बोलण्याऐवजी दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकरी यावर बोलण्याची गरज आहे. उद्धव ठाकरेंचा कोणावरच विश्वास नसल्याची खरमरीत टीका दानवे यांनी केली. यावेळी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, वसंतराव जगताप, भगवान कदम, किशोर कदम, पद्माकर जऱ्हाड, कैलास तात्या मदन, विलासराव जऱ्हाड, प्रदीप साबळे, हरिभाऊ सुकासे, कल्याणराव काळे, विष्णू कोल्हे, जनाबापू चोरमारे, परमेश्वर शिंदे, संजय घुगे, रुद्रदेव, भगवानराव मदन, शिवाजी वेताळ, गजानन काटकर, अमोल चव्हाण, गजानन मोरे, राजाभाऊ निंबाळकर, आप्पा पाटील कदम, हरिभाऊ कबाडे, नवनाथ वाघ, अनिल कोळकर, विकास वाघ, ड. बालाजी वाघ, श्रीराम वाघ, संतोष कदम, संजय घुशिंगे, रामसिंग घुशिंगे, आदिनाथ फटाले, तात्याराव म्हात्रे, भरत कान्हेरे, परमेश्वर कबाडे, ज्ञानदेव मदन, किशोर कदम, किशोर जाधव, गणेश जगताप, परसराम जोगदंड, अमोल जगताप, संदीप चंद यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले

आलेली पिके पूर्णपणे करपून गेली आहेत. मोठा खर्च करून आणि कष्टाने उभी केलेली पिके डोळ्यांसमोर नष्ट झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. अनेक पिकांमधून उत्पादन खर्चही निघण्याची शक्यता नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. ही केवळ पिकांची हानी नसून शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर आलेले गंभीर संकट असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

तातडीने पंचनामे करून दुष्काळ जाहीर करा सरकारने दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, दुष्काळ जाहीर करून सर्व दुष्काळी सवलती लागू कराव्यात आणि शेतकऱ्यांना हेक्टरी किमान एक लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी माजी मंत्री राजेश टोपे यांनी केली. शेतमजूर कुटुंबांच्याही रोजगारावर परिणाम झाल्याने प्रत्येक कुटुंबाला २५ हजार रुपयांची विशेष मदत देण्याची मागणी त्यांनी केली. चारा आणि पाणीटंचाईचे संकट गंभीर

दुष्काळामुळे अनेक गावांतील विहिरी व जलस्त्रोत कोरडे पडले आहेत. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. सरकारने टंचाईग्रस्त गावांमध्ये तातडीने शासकीय टँकर सुरू करावेत. पशुधन वाचविण्यासाठी चारा छावण्या उभारून पुरेसा चारा, पाणी आणि आवश्यक पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

पीकविमा आणि कर्जमाफीचा लाभ तत्काळ द्या

एक रुपयातील पीकविमा योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावी. योजनेतून पूर्वी वगळण्यात आलेले शेतकरीहिताचे सर्व निकष पुन्हा लागू करून पीक कापणीचा निकष न लावता सर्व पात्र शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम सरसकट आणि तातडीने अदा करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी योजनेची तातडीने अंमलबजावणी करावी. नवीन पीककर्ज तत्काळ उपलब्ध करून द्यावे आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहनपर अनुदान ५० हजारांवरून एक लाख रुपये करावे. सन २०२५-२६ मध्ये पीककर्ज घेऊन यंदा थकीत झालेल्या शेतकऱ्यांचाही कर्जमाफी योजनेमध्ये समावेश करण्याची मागणी करण्यात आली.

फळबागा वाचविण्यासाठी २०१२ मधील मदतीच्या धर्तीवर हेक्टरी एक लाख रुपयांचे विशेष अर्थसाहाय्य तातडीने द्यावे, असेही शेतकऱ्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करा

दुष्काळाचा परिणाम शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ नये, यासाठी शाळा, महाविद्यालये आणि अन्य शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांचे केवळ परीक्षा शुल्क नव्हे, तर संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करावे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यात विशेष कामे सुरू करून शेतमजूर आणि गरजू नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

दुष्काळाच्या काळात जळालेले किंवा नादुरुस्त विद्युत रोहित्र तातडीने दुरुस्त करण्यासाठी ऊर्जा विभागाने विशेष मोहीम राबवावी, जेणेकरून उपलब्ध पाण्याच्या आधारे पिके वाचविण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना अडचण येणार नाही, असेही शेतकऱ्यांनी नमूद केले.

या पाहणी दौऱ्यावेळी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या शासनापर्यंत पोहोचवून त्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

## घाणेवाडी तलाव परिसरात

२०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून २६ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे जालना जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

## आ. नारायण कुचे थेट शेतकऱ्यांच्या

देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरू असल्याचे आ. कुचे यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांच्या प्रश्नांना शासनाच्या योग्य व्यासपीठावर मांडणे आणि आवश्यक मदतीसाठी सातत्याने पाठपुरावा करणे सुरूच राहील, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली. बळीराजाच्या हितासाठी सदैव कटिबद्ध असून, संकटाच्या काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडे ठोस पाठपुरावा केला जाईल, असे आ. नारायण कुचे यांनी सांगितले.

## बकऱ्या चोरी प्रकरणी

यांना अटक करण्यात आली. परतूर पोलिस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ४६८/२०२६ मध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल आहे. पुढील तपासात परतूर, बदनापूर, अंबड, चंदनझिरा, मौजपुरी, मंठा, सदर बाजार, जालना, तीर्थपुरी आणि पारध पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्ह्यांशी या प्रकरणाचा संबंध समोर आल्याचा पोलिसांचा दावा आहे. संबंधित १८ गुन्हे २०२५ आणि २०२६ या वर्षांत नोंदवलेले आहेत. ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव आणि पथकाने केली. या प्रकरणातील इतर तपशीलांचा तपास सुरू आहे.

## गणरायाच्या साक्षीने डॉ. उमेश

कार्याबद्दल उपस्थित ग्रामस्थांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. यावेळी विविध गणेश मंडळांच्या आरत्या मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाल्या. तसेच अनियमित पाऊस, नैसर्गिक संकटे आणि शेतीसमोरील आव्हानांमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा मिळावा व त्यांच्या व्यथा गणरायाने ऐकाव्यात, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमास गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक, मित्रमंडळ, गणेश मंडळांचे पदाधिकारी तसेच स्वरा फाउंडेशनचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, समाजसेवा आणि जनजागृतीचा संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम विशेष ठरला.

## गणेश विसर्जनासाठी जालन्यात

वाहतूक नूतन वसाहत, अंबड चौफुली व मंठा चौफुली मार्गे वळविण्यात येणार आहे. याशिवाय छत्रपती संभाजीनगरकडून जालना मोतीबाग मार्गे अंबड, रेवगाव, घनसावंगी, मंठा, सिंदखेडराजाकडे जाणारी वाहतूक ग्रेडर टी पॉइंट, राजूर चौफुली, नवीन मोंढा, कन्हैया नगर मार्गे बायपास रोडने वळविण्यात येणार आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी पोलिस प्रशासनाने दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करावे. वरील आदेश दि. २५ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ७ वाजेपासुन श्रीगणेश विसर्जन होईपर्यंत अंमलात राहिल असे आवाहन करण्यात आले आहे.

## राजाच्या चरणी 'धाकट्या सुनबाई' मालिकेचा शुभारंभ

मुंबई: गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने सुरू होणारी प्रत्येक नवी सुरुवात खास असते. याच भावनेतून झी मराठीने आपल्या आगामी 'धाकट्या सुनबाई' या नव्या मालिकेची नेहमीच्या पद्धतीने प्रेस मीट न करता, थेट गणरायाच्या चरणी शुभारंभ केला. गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात, मुंबईचा राजा गणेश गल्ली समोर मालिकेची खास प्रेस मीट पार पडली. निर्माते महेश कोठारे, मालिकेतील कलाकार मंदार जाधव, चिन्मयी मोरे, मुग्धा कर्णिक यांच्यासह संपूर्ण टीम यावेळी उपस्थित होती.

मालिकेत मंदार जाधव वेदांत पटवर्धन ही भूमिका साकारत असून, तो कुटुंबावर प्रेम करणारा, प्रत्येकाला साथ देणारा आणि अन्यायाविरोधात ठामपणे उभा राहणारा तरुण आहे. तर चिन्मयी मोरे राधिकाच्या भूमिकेतून पहिल्यांदाच दैनंदिन मालिकेच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर येत आहे. या मालिकेत दोन कुटुंबांची गोष्ट, त्यांचे विचार आणि नात्यांमधील गुंतागुंत पाहायला मिळणार आहे. आपल्या माणसांची साथ आणि नात्यांमधला विश्वास आयुष्याला कसा अर्थ देतो, याची गोष्ट राधिका आणि वेदांतच्या आयुष्यातून 'धाकट्या सुनबाई' मालिकेत उलगडणार आहे. आपल्या पहिल्या मालिकेबद्दल बोलताना चिन्मयी मोरे म्हणाली, माझ्यासाठी हा प्रवास खूप खास आहे आणि या सगळ्याची सुरुवात मुंबईच्या राजाच्या चरणी होत आहे, यापेक्षा सुंदर आणखी काय असू शकतं! माझ्या पहिल्या मालिकेसाठी झी मराठीसारखं उत्तम व्यासपीठ, महेश कोठारे सरांचं कोठारे व्हिजन सारखं प्रोडक्शन हाऊस, खूप छान सहकलाकार आणि आजची ही प्रेस मीटसुद्धा इतक्या सुंदर आणि शुभ ठिकाणी होत आहे. सगळ्या गोष्टी अगदी योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने जुळून आल्या आहेत. त्यामुळे मी खूप आनंदी आणि भारावलेली आहे. या सगळ्यासाठी मी बाप्पाचे मनापासून आभार मानते आणि 'धाकट्या सुनबाई'ला प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळावं, अशी बाप्पाकडे प्रार्थना करते.

मंदार जाधवनेही या खास प्रसंगाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले, 'धाकट्या सुनबाई'च्या प्रेस मीटची सुरुवात मुंबईच्या राजाच्या आशीर्वादाने होत आहे, यासाठी मी खूप आनंदी आणि स्वतःला खूप भाग्यवान समजतो. गणेशोत्सवासारख्या मंगलमय आणि महत्त्वाच्या प्रसंगी, अशा शुभ ठिकाणी आपल्या मालिकेचा प्रेस लॉन्च होणं ही आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. त्यासोबतच आज आम्हाला प्रेक्षकांनाही प्रत्यक्ष भेटता आलं आणि आमच्या नव्या मालिकेबद्दल त्यांना स्वतः सांगता आलं, हीसुद्धा खूप आनंदाची गोष्ट आहे. बाप्पाचा आशीर्वाद या मालिकेला मिळाला आहे, अशी भावना मनात आहे. आता आम्ही २८ सप्टेंबरची आतुरतेने वाट पाहत आहोत. गणरायाच्या आशीर्वादाने सुरू झालेला हा नवा प्रवास आता प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. 'धाकट्या सुनबाई' येत्या २८ सप्टेंबरपासून सायंकाळी ०६.३० वाजता प्रेक्षकांना झी मराठीवर पाहायला मिळणार आहे.

**टी.सी. हरवली आहे.**

गणेश विठ्ठल आर्दड या विद्यार्थ्यांची वर्ग १२ वी (शाखा विज्ञान ) उत्तीर्ण झाल्याची टी.सी. अंबड ते कुंभार पिंपळगाव प्रवासादरम्यान हरवली आहे. सदर टी.सी. कोणास आढळून आल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

.....संपर्क.....

मो. नं. 7972761658

**टी.सी. हरवली आहे.**

राणी पांडुरंग करपे या विद्यार्थिनीची B.Sc. Third Year (TY) उत्तीर्ण झाल्याची टी.सी. अंबड ते कुंभार पिंपळगाव प्रवासादरम्यान हरवली आहे. सदर टी.सी. कोणास आढळून आल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

.....संपर्क.....

मो. नं. 8605935222







जालना शहर महानगरपालिकेतर्फे बाप्पाच्या विसर्जनासाठी पूर्ण तयारी झाली असून त्यांनी सार्वजनिक आव्हान केले आहे की मोठ्या गणेश मूर्ती तसेच घरगुती गणेश मूर्तींचे विसर्जन मोतीबाग येथील विसर्जन कुंडात करावे पण पीओपी मूर्ती पाण्यात विसर्जन करू नये व मोठ्या मुर्त्या ह्या पीओपीच्या बनलेल्या असून त्या विसर्जन कराव्या का नाही असा प्रश्न उद्भवला आहे व आजचा अकरावा दिवस असल्यामुळे शास्त्रानुसार १२ व्या दिवशी विसर्जन होत नसल्यामुळे आजच काही लोकांनी विसर्जन केले आहे. **छाया/किरण खानापुरे**

# योगीराज कैलासनाथ महाराजांच्या हस्ते घोगरे पाटील पेट्रोल पंपाचे उद्घाटन ; परिसरातील वाहनधारकांना आधुनिक इंधन सुविधा उपलब्ध होणार

**किशोर मोरे /घनसावंगी** (प्रतिनिधी) : अंबड-पाथरी रोड, सिंदखेड येथे नव्याने उभारण्यात आलेल्या घोगरे पाटील पेट्रोल पंपाचे उद्घाटन धार्मिक व उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. योगीराज कैलासनाथ महाराज व उद्धवराव लिपणे यांच्या शुभहस्ते पेट्रोल पंपाचे लोकार्पण झाले. यावेळी घनसावंगी शहराचे माजी नगराध्यक्ष नंदकुमार देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते फीत कापून पेट्रोल पंपाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी घोगरे पाटील परिवाराचे अभिनंदन करून या नव्या उपक्रमामुळे परिसरातील नागरिक व वाहनधारकांना मोठी सुविधा उपलब्ध होणार असल्याचे नमूद केले.







अंबड-पाथरी हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा मार्ग असून, या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहू वाहनांची ये-जा सुरू असते. परिसरातील वाहनधारकांना इंधनासाठी यापूर्वी दूरवर जावे लागत होते. मात्र, सिंदखेड येथे पेट्रोल पंप सुरू झाल्याने स्थानिक नागरिकांसह या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना दर्जेदार व तत्पर इंधन सेवा उपलब्ध होणार आहे.

योगीराज कैलासनाथ महाराज यांनी मार्गदर्शन करताना उद्योग, सेवा आणि समाजहित यांचा समतोल राखणे आवश्यक असल्याचे (**पान ३ वर**)

# गणेश विसर्जन मिरवणुकीत गोंधळ घालणाऱ्या ४३५ जणांना प्रतिबंधात्मक मनाई हुकूम जारी

जालना/प्रतिनिधी : गणेशोत्सव विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडाव्यात, यासाठी जालना जिल्हा पोलिसांनी प्रतिबंधात्मक पाऊल उचलले आहे. मिरवणुकीदरम्यान शांतता भंग होण्याची शक्यता असलेल्या जिल्ह्यातील ४३५ जणांना विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यास मनाई करणारे हुकूम जारी करण्यात आले आहेत. जालना पोलिस अधीक्षक कार्यालयाने २४ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, जिल्ह्यातील संबंधित पोलिस ठाणे आणि तालुका हद्दीतील व्यक्तींबाबत हे आदेश काढण्यात आले आहेत. भारतीय नागरिक



सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांनी हे मनाई हुकूम पारित केले. गणेश विसर्जनाच्या वेळी विविध भागांतून मिरवणुका निघतात आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतात. अशा वेळी कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी संभाव्य शांतताभंग रोखण्याच्या उद्देशाने (**पान ३ वर**)

# मराठवाडा संघटन आढावा दौरा: जालना जिल्ह्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

जालना: शिवसेना मुख्यनेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथराव शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या सूचनेनुसार राज्यभरात मराठवाडा - संघटन आढावा दौरा सुरू आहे. या दौऱ्यांतर्गत आज जालना येथे शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जालना,



बदनापूर, भोकरदन, परतूर आणि घनसावंगी या पाचही विधानसभा मतदारसंघांतील संघटनेच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या प्रसंगी पक्षातील प्रलंबित प्रश्न, प्रलंबित संघटनात्मक नेमणुका, पदाधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन तसेच संघटन वाढवताना येणाऱ्या विविध अडचणींवर सविस्तर चर्चा झाली. आगामी काळात शिवसेना पक्षाचा जिल्ह्यात अधिक मजबुतीने विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेल्या नियोजनाची रूपरेषा या वेळी ठरवण्यात आली. संघटना मजबूत करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी (**पान ३ वर**)

# विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या नागरिकांसाठी विशेष अभियान : 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान'चा लाभ घेण्याचे सहायक संचालक अनंत कदम यांचे आवाहन

जालना दि.२४(जिमाका) : विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना आवश्यक ओळखपत्रे व विविध प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासह शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता' अभियानांतर्गत २७, २८ आणि २९ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यात विशेष 'भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान' राबविण्यात येणार आहे. पात्र नागरिकांनी या विशेष अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर




मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अनंत कदम यांनी केले आहे.

या अभियानासाठी महसूल विभाग, योजनांशी संबंधित विविध शासकीय विभाग तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळ व तालुकास्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातींची भटकंतीची जीवनशैली लक्षात घेऊन शासनाच्या विविध योजना आणि मूलभूत हक्कांशी संबंधित कागदपत्रे त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे हा अभियानाचा उद्देश आहे. अभियानात आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, उत्पन्नाचा दाखला, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, रहिवासी अथवा अधिवास दाखला, विवाह नोंदणी तसेच दिव्यांग प्रमाणपत्र यासारखी आवश्यक कागदपत्रे पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे.

यासोबतच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन (**पान ३ वर**)

### तालुकानिहाय शिबिरांचे वेळापत्रक

**जालना तालुका** : २७ सप्टेंबर रोजी शिकलगीर वस्ती, रामनगर, जालना येथे, तर २८ सप्टेंबर रोजी वडार वस्ती, शिवनगर, जालना येथे शिबिर होणार आहे.

**बदनापूर तालुका** : २७ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, आन्वी येथे, २८ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, धामणगाव येथे, तर २९ सप्टेंबर रोजी बंजारा वस्ती, वसंतनगर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

**अंबड तालुका** : २७ सप्टेंबर रोजी नाथगोसावी वस्ती व बाबर वस्ती, अंबड येथे, तर २८ सप्टेंबर रोजी लोहार वस्ती व बंजारा वस्ती, (**पान ३ वर**)

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून उपक्रम; इंडिगोच्या सीएसआर कार्यक्रमातून मार्गदर्शन

जालना/प्रतिनिधी : आकाशात झेप घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या जालन्यातील मुलींना व्यावसायिक वैमानिक (कमर्शियल पायलट) होण्याची दिशा मिळाली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या 'गिव्हिंग विंग्ज टू फ्लाय' या विशेष कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमधील २५० हून अधिक विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

इंडिगोच्या सीएसआर उपक्रमांतर्गत भारत केअर्सच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधी, कमर्शियल पायलट होण्यासाठीची पात्रता, प्रशिक्षण आणि निवड प्रक्रियेबाबत विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया आणि अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या उपस्थितीत झाले. पारंपरिक करिअरच्या पर्यायांबरोबरच विमान वाहतूक क्षेत्रातील संधींचा विचार करण्याचे आवाहन यावेळी विद्यार्थिनींना करण्यात आले.

भारत केअर्सचे कार्यक्रम समन्वयक कल्पेश मोहोद आणि मास्टर ट्रेनर रुपेश गाडेकर यांनी विद्यार्थिनींना कमर्शियल पायलट होण्यासाठी आवश्यक पात्रता, निवड प्रक्रिया, प्रशिक्षण तसेच भविष्यातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी पायलट प्रशिक्षण, अभ्यासक्रम, पात्रता आणि विमान वाहतूक क्षेत्रातील करिअरविषयी विविध प्रश्न विचारले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या सत्रामुळे विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन झाले. ालन्यातील बारवाले महाविद्यालयाच्या कॅप्टन गार्गी गिरी यांनी विद्यार्थिनींशी



संवाद साधला. नुकतेच दक्षिण आफ्रिकेत कमर्शियल पायलट प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गिरी यांनी पायलट होण्याचा स्वतः चा प्रवास, प्रशिक्षणादरम्यान आलेल्या अडचणी आणि त्यासाठी केलेल्या मेहनतीची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने महत्त्वाची भूमिका होती. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात, शिक्षण विस्तार अधिकारी विनया वडजे, समन्वयक सुनील ढाकरके आणि तंत्रस्नेही सोरटी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. कलेक्टर थिंक टँक फेलो सुप्रविण पाखरे, मुख्यमंत्री फेलो सिमरन जैस्वाल आणि मुख्यमंत्री फेलो तनया सावंत यांनीही आयोजन व समन्वयासाठी सहकार्य केले.

कार्यशाळेला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता 'गिव्हिंग विंग्ज टू फ्लाय'च्या दुसऱ्या बॅचसाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदणी सुरू आहे. पात्र विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जालना जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंगारकी चतुर्थी निमित्त वाहतुक मार्गात बदल

जालना/प्रतिनिधी : पोलीस ठाणे हसनाबाद हद्दीतील मौजे राजूर ता. भोकरदन येथे दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी अंगारकी चतुर्थी निमित्त श्री गणपती दर्शनासाठी मोठया प्रमाणावर भाविक मराठवाडा, खान्देश, विदर्भ येथून येतात. तसेच जालना शहरातून व भोकरदन, जाफ्राबाद भागातून मोठ्या प्रमाणावर स्त्रिया, पुरुष, अबालवृध्द, लहान मुले पायी दर्शनासाठी येतात. तसेच नमुद तिर्थक्षेत्र स्थळास महाराष्ट्र शासनाने पर्यटन स्थळाचा दर्जा दिला असल्याने भाविकांची गर्दी राहणार आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ ची कलम ३६ अन्वये पोलीस अधीक्षक, तेघबीर सिंह संधू, यांना प्राप्त अधिकारान्वये आदेशीत करीत आहेत. पोलीस ठाणे हसनाबाद हद्दीतील मौजे राजूर ता. भोकरदन येथे दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी अंगारकी चतुर्थी निमित्त श्री गणपती दर्शनासाठी येणारे भाविकांची गैरसोय होवू नये तसेच अनुचित प्रकार टाळण्यासाठी तसेच वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी व वाहतुकीची कोंडी होऊ नये व कायदा व सुव्यवस्था सुरळीत रहावी म्हणून या दृष्टीकोनातून राजूर ता. भोकरदन कडे जाणारे व येणारे वाहनांचे वाहतुकीत अंशतः बदल करण्यात येत आहे. वळविण्यात आलेल्या वाहतुकींचे मार्ग भोकरदन चौफुली जालना येथून राजुर, भोकरदनकडे जाणारे जड वाहनधारक हे (भक्तांची वाहने वगळून) देऊळगांव राजा, जाफ्राबाद, माहोरा मार्गे भोकरदनकडे जातील व येतील. भोकरदन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयापासून राजुर मार्गे जालना कडे येणारे जड वाहनधारक हे (भक्तांची वाहने वगळून) माहोरा, जाफ्राबाद, देऊळगांव राजा या मार्गाने जालना कडे जातील व येतील.दाभाडी कडून राजूर मार्गे भोकदनकडे जाणारे जड वाहनधारक हे (भक्तांची वाहने वगळून) हसनाबाद मार्गे भोकरदनकडे जातील व येतील. टेंभुर्णीकडून राजूर मार्गे जालनाकडे येणारे जड वाहनधारक हे (भक्तांची वाहने वगळून) देऊळगाव राजा मार्गे जालनाकडे जातील व येतील. टेंभुर्णीकडून राजूर मार्गे भोकरदनकडे जाणारे जड वाहनधाक हे (भक्तांची वाहने वगळून) जाफ्राबाद-माहोरा मार्गे भोकरदन कडे जातील व येतील. वरील मार्गाची जड वाहतुक दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या २.०० वाजेपासुन दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजीच्या २.००वाजेपर्यंत बदल करण्यात आलेला आहे. तरी सर्व वाहनधारकांनी याची नोंद घ्यावी. हा आदेश २८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या २.०० वाजेपासुन दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजीच्या २.००वाजेपर्यंत अंमलात राहील.

# खेळांमुळे व्यक्तिमत्त्वाला शिस्त आणि कणखरता लाभते : डॉ. सुदामराव गवारे

जालना (प्रतिनिधी) : खेळ केवळ शारीरिक तंदुरुस्तीपुरते मर्यादित नसून ते विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा आणि आत्मिक बळ देतात. तायक्वांदोसारख्या मार्शल आर्ट्समुळे मुलांमध्ये आत्मविश्वास, स्वसंरक्षणाची क्षमता आणि कठोर शिस्त निर्माण होते, असे प्रतिपादन जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सुदामराव गवारे यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना व तायक्वांदो असोसिएशन ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेचे उद्घाटन आज, गुरुवार दि. २४ सप्टेंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुलाच्या सभागृहात डॉ. सुदामराव गवारे यांच्या हस्ते पार पडले. त्याप्रसंगी ते बोलत होते. या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी तायक्वांदो असोसिएशन ऑफ जालनाचे अध्यक्ष अरविंद देशमुख होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून असोसिएशनचे महासचिव सचिन आर्य, क्रीडा अधिकारी जोगदंड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शेख नईम वस्ताद, पत्रकार सदानंद देशमुख, राजा शिवछत्रपती मार्शल आर्ट असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक पडूळ तसेच जिल्हा स्त्री रुग्णालयाचे कार्यालयीन अधीक्षक द्वारकादास चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. गवारे पुढे म्हणाले की, शालेय जीवनापासूनच मैदानी खेळांची सवय असणे काळाची गरज आहे. खेळातील जय-पराजयापेक्षा खिलाडूवृत्ती अंगीकारणे अधिक महत्त्वाचे असून अशा स्पर्धांतूनच उद्याचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात अरविंद देशमुख म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागातील शालेय खेळाडूंमध्ये अफाट क्षमता असून, त्यांना योग्य व्यासपीठ आणि तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळवून देणे हाच असोसिएशनचा मुख्य उद्देश आहे. तायक्वांदो हा केवळ पदकांपुरता मर्यादित खेळ नसून ती जीवन जगण्याची कला व स्वसंरक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी विभागीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, असे आव्हान त्यांनी केले. या स्पर्धेत जालना जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सुमारे ७० ते ७५ खेळाडूंनी सहभाग नोंदवत आपले कौशल्य पणाला लावले. या स्पर्धेतील विविध वजन गटातील विजेत्या खेळाडूंची आगामी विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेचे सामने सुरळीत पार पाडण्यासाठी पंच म्हणून फाईम खान, सय्यद निसार, राहुल ढाकणे, आदित्य चव्हाण, विष्णू चव्हाण, भागवत गोरे आणि सोनाली पंडित यांनी काम पाहिले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा शिक्षक, पालक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.